**सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठीच्या अभिन्यास मंजुरीच्या शिथीलतेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :-टिपीएस.२०१९/प्र.क्र.७७/२०१९/नवि-३०**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २७/०८/२०१९

**<u>संदर्भ :-</u>**

१) शासन निर्णय क्रमांक: प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/योजना-१० दिनांक: १६ फेब्रुवारी, २०१८
२) शासन निर्णय क्रमांक: पीडीयु-२०१८/प्र.क्र.२५७/योजना-१० दिनांक : ०२ ऑगस्ट, २०१८
३) टिपीएस :- २०१९/अनौपचारिक संदर्भ/११/२०१९/नवि-३०

**प्रस्तावना** :-

केंद्र व राज्य सरकारच्या सन २०२२ पर्यंत सर्व बेघर कुटुंबांना घर देण्याची महत्त्वकांक्षी मोहिम हाती घेण्यात आली असून, याची अंमलबजावणी संपूर्ण राज्यामध्ये करण्यात येत आहे. ग्रामीण भागामध्ये सदर योजनेचे अंमलबजावणी करत असताना, येत असलेल्या तांत्रीक अडचणी विचारात घेऊन ग्रामीण भागामध्ये शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनाकरीता अभिन्यास मंजुर करतांना शिथीलता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूदीनुसार ग्रामीण भागात अभिन्यासास/ विकासास परवानगी देण्यात येते. सदर नियमावली प्रमाणे विकास प्रस्तावांची छाननी करुन, त्यांस मान्यता जिल्हास्तरावर सहायक संचालक, नगररचना यांनी द्यावी.

तथापि, विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे अभिन्यासातील रस्त्यांची रुंदी उपलब्ध होत नसल्यास रस्ता रुंदीबाबत शिथीलता मंजूर करण्याचे अधिकार सहायक संचालक, नगर रचना यांना प्रदान करण्यात येत आहेत. अभिन्यासास मंजुरी देताना खालीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी.

- केंद्रशासन व राज्यशासन पुरस्कृत आवास योजनेकरीता शासकीय जमीनीवरील अभिन्यास तयार करण्याची कार्यवाही संबंधीत जिल्हापरीषदेमधील तांत्रिक अधिकारी/ अभियंते यांचेकडून करण्यात यावी;
- सदर अभिन्यासाच्या उपयुक्त क्षेत्रफळाची मर्यादा संबंधीत जिल्हाधिकारी यांनी प्रमाणीत करावी;
- तद्नंतर प्रस्तावाची तांत्रिक छाननी करुन जिल्हास्तरावरील संबंधीत सहायक संचालक, नगररचना यांनी मंजूरी प्रदान करावी;
- केंद्रशासन व राज्यशासन पुरस्कृत आवास योजनेकरीता शासकीय जमीनीवरील अभिन्यासास मंजूरी प्रदान करताना, विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे रस्त्याची रुंदी उपलब्ध होत नसल्यास त्याबाबत शिथीलता देण्याचे अधिकार सहायक संचालक, नगररचना यांना खालील अटींच्या अधिन राहून प्रदान करण्यात येत आहेत;

१. अभिन्यासातील रस्त्याची रुंदी, कोणत्याही परीस्थितीत ६ मीटर पेक्षा कमी असणार नाही.
२. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत मर्यादीत लांबीच्या रस्त्यांसाठीची रुंदी ४.५ मीटरपेक्षा कमी असणार नाही.
३. अभिन्यासातील रस्त्यांची रुंदी उपरोक्त नमुद केलेल्या प्रमाणे उपलब्ध होईल यांची खातरजमा करण्यात यावी.
४. उपरोक्त नमुद केलेल्या रस्तारूंदीपेक्षा कमी रुंदीचा रस्ता ठेवण्याबाबत शिथीलता देता येणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या सकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यास संकेताक २०१९०८२७१५३७०६९९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Veena
Baburao More

Digitally signed by Veena Baburao More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d71f88afbdaebfd4efea93eae71378a4ad1be5ded721088 6ce1e6750fe39829b, serialNumber=57c584dd5bcdc9ca4d84e4078fe62fadc5687db118 fa7f3ab707135e5660a410, cn=Veena Baburao More
Date: 2019.08.28 12:18:28 +05'30'

**( वीणा मोरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव,मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई
२) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे सहसचिव
३) अपर मुख्य सचिव/प्रधान/सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
४) विभागीय आयुक्त (सर्व)
५) जमाबंदी आयुक्त तथा संचालक,भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) सर्व जिल्हाधिकारी
७) मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हापरिषद) (सर्व)
८) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे,
९) संचालक, राज्य व्ययस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर, नवी-मुंबई.
१०) सर्व नगरपरिषद/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी,
११) सर्व जिल्हा अधिक्षक भूमीअभिलेख
१२) निवडनस्ती, कार्यासन नवि-३०